निशाणी क्रमांक १३

(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या ,१९७४ चा अधिनियम चे प्रकरण वीस अन्वये)

**संक्षिप्त संपरीक्षा केलेला खटला क्र.१२०/२०१९**

# न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, सावनेर, जि. नागपूर यांचे न्यायालय

| | | | |
|---|---|---|---|
| **१.** | अपराध घडल्याचा दिनांक | – | ११/१२/२०१८ |
| **२.** | फिर्याद दाखल दिनांक | – | ०८/०१/२०१९ |
| **३.** | फिर्यादीचे नांव व पत्ता | – | संत गाडगे बाबा नागरी सहकारी पत संस्था मर्यादीत, सावनेर, ता. सावनेर, जि. नागपूर. तर्फे अधिकृत स्वाक्षरी, दिपक सोमेश्वर भुसारी, वय : २८ वर्षे, कामधंदा : नोकरी, पत्ता: अपधुत वाडी, सावनेर, ता. सावनेर, जि. नागपूर |
| **४.** | आरोपीचे नांव व पत्ता | – | अनिल दौलतजी धानोडे, वय: वयस्क, कामधंदा : व्यवसाय/शेती, पत्ता: वार्ड क्र.८, महाजन ले आऊट जवळ, नामदेव वाढीकर, सावनेर, ता. सावनेर, जि. नागपूर |

**५. ज्याबद्दल फिर्याद दिली आहे आणि जो अपराध आरोपीला समजावुन सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशिल –**

तुम्ही दिनांक १२/११/२०१८ रोजी फिर्यादीस शिक्षक सहकारी बँक लि., सावनेर, ता. सावनेर, जि. नागपूर या बँकेचे रक्कम रुपये २५,८८९/– चा धनादेश क्र. १६२८३८ दिनांक १२/११/२०१८ चा दिला तो वटविण्यासाठी फिर्यादीने अरविंद सहकारी बँक लि., सावनेर शाखा, जिल्हा नागपूर येथे सादर केला असता न वटता दिनांक १३/११/२०१८ रोजी परत आला. तुम्हाला दिनांक २४/११/२०१८ रोजी मागणी नोटीस पाठविली, सदर नोटीसची माहिती तुम्हास मिळाली. अशा प्रकारे तुम्हास माहिती होऊनही तुम्ही धनादेशाची रक्कम अदा केली नाही व त्या अन्वये परक्राम्य अभिलेख अधिनियमाचे कलम १३८ अन्वये गुन्हा केला आहे.

**६. आरोपीचा जबाब**

**प्रश्न १ – तुम्हाला केसच्या नकला मिळाल्या काय?**

उत्तर – होय.

**प्रश्न २ – तुम्हाला ठेवण्यात आलेला आरोप जो तुम्हाला आता वाचून दाखविला तो समजला काय?**

उत्तर – होय.

**प्रश्न ३ – तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?**

उत्तर – मला गुन्हा कबुल नाही.

आरोपीची सही/अंगठा समक्ष,

--------------------

(संतोष आर. भरड)

ठिकाण : सावनेर **न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, सावनेर**

दिनांक :१७/०२/२०२३

# C E R T I F I C A T E

"I affirm that the contents of this P. D. F. File of Plae is word to word as per original Plea."

**Name of Stenographer : N. B. Payade**